**मानवी हक्क विभाग**

**प्रा. श्रीमती डॉ. एस. जे. माने**, समन्वयक

**वर्ष २०२०-२१**

**कालावधी** — ६ महिने

**सहभागी विद्यार्थी** — १०

**उद्देश -** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या आजीवन निरंतर व विस्तार कार्य विभागाअंतर्गत महाविद्यालयात मानवी हक्क प्रमाणपत्र कोर्स कार्यान्वित आहे. मानवी हक्क हा मानवाचा मूलभूत अधिकार असून जागतिक पातळीपासून ते स्थानिक पातळीवर आपल्याला दिलेले नैसर्गिक व कायदेशिर अधिकारांची ओळख व माहिती महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने हा शॉर्ट टर्म कोर्स महाविद्यालयात सुरु आहे.

या शैक्षणिक वर्षात या कोर्समध्ये दहा विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे. या कोर्सअंतर्गत शैक्षणिक अभ्यासक्रमांचा भाग म्हणून सहा पेपर शिकवले जातात. त्याच पद्धतीने विविध तज्ज्ञ व्यक्तिंचे मार्गदर्शन, प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले जातात. दि. १० डिसेंबर जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त उपप्राचार्य डॉ. डी. आर. भोसले यांचे 'आपले आरोग्य, आपले अधिकार' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. २६ नोंव्हेंबर संविधान दिनानिमित्त प्रास्ताविक वाचन, २५ जानेवारी मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांकडून तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रीकेचे उद्घाटन मा. प्राचार्या डॉ. सौ. पी. बी. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले तसेच ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त सीमेवर देशसेवा बजाशवणाऱ्या सैनिकांच्या वीरमाता / पत्नी आणि निवृत्त सैनिकांचा सत्कार घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. पी. ए. धोंगडे (कोल्हापूर) हे होते. अशा पद्धतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करून उपक्रम राबविण्यात आले.

(Mane. S. J.)